
बुधवार, २३ मार्च २०२२
# राम प्रहर
◆ वर्ष १४ ◆ अंक २४४
www.ramprahar.com
◆ पाने ६ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## एसटी विलिनीकरण निर्णयासाठी १५ दिवसांची मुदतवाढ



**मुंबई :** एसटी कर्मचाऱ्यांच्या विलिनीकरणावर अद्याप सरकार दरबारी निर्णय झालेला नाही. त्यामुळे विलिनीकरणावर निर्णय घेण्यासाठी आणखी १५ दिवसांची मुदतवाढ उच्च न्यायालयाने राज्य सरकारला दिली आहे. एसटी विलिनीकरणावर १ एप्रिलपर्यंत प्रतिज्ञापत्र सादर करीत ५ एप्रिलला होणाऱ्या पुढील सुनावणीत उत्तर देण्याचे निर्देश उच्च न्यायालयाने राज्य सरकारला दिले आहेत. अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असल्याने यावर निर्णय घेण्यात उशीर झाल्याची कबुली या वेळी राज्य सरकारने दिली. कोरोना काळात सेवा बजावताना जीव गमावलेल्या कर्मचाऱ्यांचा सहानुभूतीने विचार करा, या कर्मचाऱ्यांना योग्य ती नुकसानभरपाई मिळवून देणे ही राज्य सरकारची जबाबदारी आहे. त्यामुळे कोरोना मृत्यूबाबत जे ३५० अर्ज आलेत त्यांचा मानवतेच्या दृष्टीने विचार करा, असे निर्देशही उच्च न्यायालयाने दिले आहेत.

### अंतरंग

'मविआ सरकारकडून अनुसूचित जमातींना जाणूनबुजून लक्ष्य'/२
'कुंडलिका' झाली प्रदुषित; सांडपाणी थेट नदीपात्रात/५
महिला विश्वचषक : भारताचा बांगलादेशवर दणदणीत विजय/६

## पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुर्णाकृती शिल्पाचे अनावरण

# लोकनेते रामशेठ ठाकूर विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय 'रयत'साठी आदर्श वास्तू ठरणार

### चेअरमन डॉ. अनिल पाटील यांचे प्रतिपादन






(छाया : लक्ष्मण ठाकूर)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गुणात्मक शिक्षण हे रयत शिक्षण संस्थेचे मुख्य उद्दिष्ट असून त्या अनुषंगाने कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय रयत संस्थेसाठी आदर्श वास्तू ठरणार आहे, असे प्रतिपादन 'रयत'चे चेअरमन डॉ. अनिल पाटील यांनी मंगळवारी (दि. २२) कामोठे येथे केले.

रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज येथे पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे पुर्णाकृती शिल्प उभारण्यात आले आहे. त्याचे अनावरण डॉ. अनिल पाटील यांच्या हस्ते व संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झाले. त्या वेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष भगिरथ शिंदे, स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे उपाध्यक्ष पी. जे. पाटील, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य आर. डी. गायकवाड, मीनाताई जगधने, राजेंद्र उर्फ तात्या फाळके, आबासाहेब देशमुख, सचिव डॉ. विठ्ठल शिवणकर, माजी सचिव प्रा. गणेश ठाकूर, पश्चिम विभाग चेअरमन राम कांडगे, मध्य विभाग चेअरमन संजीव पाटील, सहसचिव संजय नागपुरे, ऑडिटर डॉ. मेनकुदळे, ओएसडी शहाजी डोंगरे, जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत, पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर, जनरल बॉडी सदस्य प्रशांत पाटील, विनायक पाटील, दशरथ भगत, सुधीर घरत, विभागीय अधिकारी आर. पी. ठाकूर यांच्यासह भाजपचे कामोठे अध्यक्ष रवींद्र जोशी, जिल्हा उपाध्यक्ष के. के. म्हात्रे, ॲड. आशा भगत, 'क' प्रभाग समिती सभापती अरुणा भगत, नगरसेवक विकास घरत, विजय चिपळेकर, नगरसेविका कुसुम म्हात्रे, हेमलता गोवारी, संतोषी तुपे, युवा नेते राजेश गायकर, रवींद्र गोवारी, कामगार नेते सुरेश पाटील यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते. (पान २ वर..)

## मुख्यमंत्र्यांचे मेहुणे श्रीधर पाटणकर यांना ईडीचा दणका

### ठाण्यातील ११ सदनिका जप्त



**ठाणे : प्रतिनिधी**

सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) मंगळवारी (दि. २२) मोठी कारवाई करीत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे मेहुणे अर्थात रश्मी ठाकरे यांचे बंधू श्रीधर पाटणकर यांच्या मालमत्तांवर जप्तीची कारवाई केली. यामध्ये ठाण्याच्या वर्तक नगर भागातील निलांबरी अपार्टमेंटमधील ११ सदनिकांचा समावेश आहे. जप्त करण्यात आलेल्या मालमत्तांची किंमत अंदाजे सहा कोटी ४५ लाख रुपये असल्याची माहिती समोर आली आहे.

ईडीकडून पुष्पक ग्रुपची एक कंपनी असलेल्या पुष्पक बुलियनच्या माध्यमातून श्री साईबाबा गृहनिर्मिती प्रायव्हेट लिमिडेटने खरेदी केलेल्या ११ सदनिका ताब्यात घेण्यात आल्या आहेत. साईबाबा गृहनिर्मिती प्रायव्हेट लिमिटेड ही कंपनी श्रीधर पाटणकर यांच्या मालकीची आहे.

नंदकिशोर चतुर्वेदी नावाचा एक एंट्री ऑपरेटर असून त्याच्या माध्यमातून ३० कोटींचे कर्ज साईबाबा गृहनिर्मिती प्रायव्हेट लिमिटेड यांना शेल कंपन्यांच्या माध्यमातून ट्रान्सफर केले गेले. त्याच पैशातून या ११ सदनिकांची खरेदी केली गेली असे सांगितले जात आहे तसेच भविष्यात श्रीधर पाटणकर यांचीदेखील ईडीच्या माध्यमातून चौकशी होण्याची शक्यता येत आहे.

याआधी ईडीने पुष्पक बुलियन आणि ग्रुप ऑफ कंपनीविरोधात ६ मार्च २०१७ रोजी आर्थिक गैरव्यवहाराचा गुन्हा दाखल केला होता तसेच याआधीच ग्रुपच्या मालकीची २१ कोटी ४६ लाख रुपये किमतीची मालमत्ता जप्त करण्यात आलेली आहे.

### निवडक

#### प. बंगालमधील हिंसाचारात आठ जणांचा मृत्यू

**कोलकाता :** पश्चिम बंगालमधील बीरभूम जिल्ह्यातील रामपूरहाट येथे सोमवारी झालेल्या हिंसाचारात आठ जणांचा मृत्यू झाला आहे. या पार्श्वभूमीवर भाजप प्रदेशाध्यक्ष सुकांत मजुमदार यांच्या नेतृत्वाखाली भाजप खासदारांनी मंगळवारी (दि. २२) गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. गृहमंत्री शाह यांनी या प्रकरणी ७२ तासांत राज्य सरकारकडून अहवाल मागून घ्यावा, असे निर्देश अधिकाऱ्यांना दिले आहेत.

#### टोलनाक्याजवळ राहणाऱ्यांना पास देण्याचा प्रस्ताव

**नवी दिल्ली :** टोलनाक्याजवळ राहणाऱ्या नागरिकांना पास देण्याचा प्रस्ताव विचारधीन असल्याची माहिती केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी लोकसभेत दिली. या वेळी त्यांनी ६० किमीच्या आत एकच टोलनाका असेल असे सांगत जर दुसरा टोल प्लाझा असेल, तर तो पुढील तीन महिन्यांत बंद केला जाईल, असेही स्पष्ट केले.

### पाणीटंचाई दूर करण्याचे आश्वासन कागदावरच!

## संतप्त न्हावा ग्रामस्थांची सिडको भवनवर धडक; अधिकाऱ्यांना घेराव



**उरण : प्रतिनिधी**

दररोज पाच तास पाणीपुरवठा करण्याचे सिडकोने दिलेले आश्वासन फोल ठरल्याने आणि १५ दिवसांत फक्त अर्धा तासच पाणी मिळत असल्याच्या निषेधार्थ सर्वपक्षीय न्हावा ग्रामस्थांनी सोमवारी (दि. २१) नवी मुंबईतील सिडको भवनवर मोर्चा काढून अधिकाऱ्यांना घेराव घातला.

न्हावा ग्रामपंचायतींची न्हावाखाडी आणि तीन पाडे मिळून जवळपास साडेचार हजार लोकसंख्या आहे. लोकसंख्येच्या मानाने दररोज नागरिकांना पुरेसा पाणीपुरवठा करण्यासाठी ग्रामपंचायतीची दररोज दीड लाख लिटर पाण्याची मागणी आहे, मात्र मागील काही महिन्यांपासून मागणीच्या निम्म्याहूनही कमी पाणीपुरवठा होत आहे. अपुऱ्या पाणीपुरवठ्यामुळे नोव्हेंबर महिन्यापासूनच पाणीटंचाईचा सामना करण्याची वेळ ग्रामस्थांवर येऊन ठेपली आहे.

पाणीटंचाईमुळे ग्रामस्थांना तलाव, विहीर आणि उपलब्ध इतर स्रोतांचा आधार घ्यावा लागत आहे. त्यानंतरही पुरेशा प्रमाणात नागरिकांना पाणी मिळत नाही. पाणीटंचाईचे संकट दूर करण्यासाठी मंत्रालयात पालकमंत्री आदिती तटकरे, खासदार सुनील तटकरे, आमदार महेश बालदी, काँग्रेस जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांच्या उपस्थितीत संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन चर्चा करण्यात आली होती. (पान २ वर..)

## पाण्याचे कनेक्शन तोडण्यासाठी आलेल्या सिडको अधिकाऱ्यांना शिवाजीनगर ग्रामस्थांनी हाकलले



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गव्हाण ग्रामपंचायतीला कोणतीही पूर्वकल्पना न देता मंगळवारी (दि. २२) शिवाजीनगर येथील पिण्याच्या पाण्याचे कनेक्शन तोडण्यासाठी आलेल्या सिडकोच्या अधिकाऱ्यांना संतप्त ग्रामस्थांनी हाकलून लावले. पूर्वीपासून असणारे पाण्याचे कनेक्शन तोडण्यास या वेळी ग्रामस्थांनी प्रखर विरोध दर्शविला.

गव्हाण ग्रामपंचायत हद्दीतील शिवाजीनगर येथील पिण्याचे पाण्याचे कनेक्शन पूर्वसूचना न देता तोडण्यासाठी सिडकोचे अधिकारी पोलिसांसमवेत मंगळवारी आले होते. या वेळी उपसरपंच विजय घरत, शिवाजी नगर अध्यक्ष कृष्णाशेठ ठाकूर, जी. के. ठाकूर, विजय ठाकूर, पी. के. ठाकूर, विनोद कडू, महेश ठाकूर, हरजीवन ठाकूर, प्रमोद ठाकूर, सुनील पाटील, पंढरीनाथ ठाकूर, एकनाथ ठाकूर, महिला नंदा ठाकूर, अहिल्याबाई ठाकूर, मालती ठाकूर, आशा म्हात्रे, कुसुम ठाकूर, शांताबाई ठाकूर, रजनी ठाकूर, वंदना ठाकूर तसेच मोठ्या प्रमाणात ग्रामस्थ व महिला जमल्या आणि त्यांनी सिडको प्रशासनाला हाकलून लावले. पाण्याचे कनेक्शन तोडण्यास आमचा विरोध असल्याचे ग्रामस्थांनी ठणकावून सांगत सिडकोला कारवाईपासून रोखले.

## पनवेलमध्ये धम्म परिषद उत्साहात

### मान्यवरांची उपस्थिती





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाड चवदार तळे सत्याग्रहाच्या वर्धापन दिनानिमित्त पनवेलच्या महापौर डॉ. कविता चौतमोल व सिद्धार्थ फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात सोमवारी (दि. २१) धम्म परिषद आयोजित करण्यात आली होती. पूज्य भदंत के. आर. लामा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या धम्म परिषदेचे उद्‌घाटन पूज्य भदंत करुणानंद थेरो यांच्या हस्ते झाले.

महान कारूणिक तथागत सम्यक संबुद्धांनी जो सुख, शांती व दुःखमुक्तीचा मानवतावादी धम्म संपूर्ण विश्वाला दिला त्या अतुलनीय धम्माचे सर्वांना ज्ञान व्हावे या भावनेने ही परिषद आयोजित करण्यात आली होती. या धम्म परिषदेत देशभरातील पूज्य भिक्षू-भिक्षुणी, श्रामणेर-श्रामणेरी व बौद्ध धम्माच्या अभ्यासकांनी उपस्थितांना धम्मदेशना दिली.

या परिषदेला महापौर डॉ. कविता चौतमोल, उपमहापौर सीताताई पाटील, सभागृह नेते परेश ठाकूर, नगरसेवक संतोष शेट्टी, प्रकाश बिनेदार, नगरसेविका चारूशीला घरत, दर्शना भोईर, सुशिला घरत, राजश्री वावेकर, आरती नवघरे, जि. प. सदस्य अमित जाधव, पूज्य भदंत धम्मानंद थेरो, अतुलरत्न, धम्मबोधी थेरो, करुनानंद थेरो, शांतीरत्न थेरो आदी उपस्थित होते.

## विवेक पाटील यांच्या जामीन अर्जावरील सुनावणी आता २४ मार्चला




**पनवेल : प्रतिनिधी**

बोगस कर्ज प्रकरणामुळे अडचणीत आलेल्या कर्नाळा नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष आणि शेकापचे माजी आमदार विवेक पाटील यांच्या जामीन अर्जावरील सुनावणी २४ मार्चपर्यंत पुढे ढकलण्यात आली आहे. त्यामुळे त्यांचा तळोजा तुरुंगातील मुक्काम आणखी वाढला आहे.

मुंबईच्या सत्र न्यायालयात सोमवारी (दि. २१) झालेल्या सुनावणीच्या वेळी सक्तवसुली संचालनालयातर्फे (ईडी) ॲड. सुनील गोन्साल्वीस, ईडीचे असिस्टंट डायरेक्टर सुनील कुमार आणि प्रेमसिंग मिना उपस्थित होते. विवेक पाटील यांच्यातर्फे ॲड. राहुल ठाकूर हजर होते. या वेळी ॲड. गोन्साल्वीस यांनी युक्तिवाद केला. त्यानंतर न्यायालयाने पुढील सुनावणी २४ मार्चला करण्याचा निर्णय घेतला.

## मावळ लोकसभा मतदारसंघावरून शिवसेनेचा राष्ट्रवादीला इशारा





**जालना : प्रतिनिधी**

महाविकास आघाडीतील दोन घटक पक्ष असणाऱ्या शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात मावळ लोकसभा मतदारसंघावरून नव्या वादाला तोंड फुटले आहे. एका फेसबुक पोस्टमुळे हा मतदारसंघ पार्थ पवार यांच्यासाठी सोडण्याची चर्चा रंगली असून यावरून खासदार श्रीरंग बारणे यांनी शिवसेनेला डिवचण्याचा प्रयत्न करू नये, असा इशारा राष्ट्रवादीला दिला आहे.

२०१९ साली झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत मावळ मतदारसंघामध्ये शिवसेनेचे श्रीरंग बारणे यांनी राष्ट्रवादीचे उमेदवार पार्थ पवार यांचा दारुण पराभव केला. पार्थ हे राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांचे नातू आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र असून त्यांचा पराभव राष्ट्रवादीसाठी मोठा धक्का ठरला होता. त्यानंतर एका फेसबुक पोस्टमुळे मावळ मतदारसंघ पार्थ यांच्यासाठी सोडण्याची चर्चा रंगली आहे.

मावळ लोकसभा मतदारसंघ शिवसेनेने पार्थ पवार यांच्यासाठी सोडून मनाचा मोठेपण दाखवावा, अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे कार्याध्यक्ष नितीन देशमुख यांनी केली आहे. पार्थ पवार यांच्या २१ मार्च रोजी झालेल्या वाढदिवसानिमित्त त्यांना शुभेच्छा देत देशमुख यांनी फेसबुक पोस्ट करीत ही मागणी केली आहे तसेच मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार तथा शिवसेना नेते श्रीरंग बारणे यांना राज्यसभेत पाठवावे, असेही देशमुख यांनी म्हटले आहे.

जालन्यात एका कार्यक्रमानिमित्त मंगळवारी खासदार बारणे यांनी पत्रकारांशी बोलताना शिवसेनेला डिवचण्याचे काम जर महाविकास आघाडीमधून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष करीत असेल, तर शिवसैनिकांकडून तसेच उत्तर मिळेल, असे म्हटले.

# मविआ सरकारकडून अनुसूचित जमातींना जाणूनबुजून लक्ष्य

## भाजप आमदार रमेश पाटील यांचा आरोप

**नवी मुंबई : बातमीदार**

महाविकास आघाडीचे सरकार या अनुसूचित जमातीतील बांधवांना जाणूनबुजून लक्ष्य करीत आहे, अशी टीका कोळी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष व भाजपचे विधान परिषदेचे आमदार रमेश पाटील यांनी केली आहे. त्यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२२ मध्ये अनुसूचित जमातीतील अधिसंख्या पदावर शासकीय व निमशासकीय सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांना संरक्षण देण्याबाबतचा प्रश्न उपस्थित केला.

अनुसूचित जमातीतील शासकीय व निमशासकीय सेवेत असलेल्या परंतु ज्यांनी जातीचे दाखले सादर केलेले नाहीत व जात वैधता प्रमाणपत्र अवैध ठरले आहेत, अशा कर्मचाऱ्यांना अधिसंख्या पदावर वर्ग करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय २०१९ साली तत्कालिन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वामधील शासनाने घेतला होता. या निर्णयामुळे अनुसूचित जमातीतील बांधवांना मोठा दिलासा मिळाला होता, परंतु मविआ सरकार या अनुसूचित जमातीतील बांधवांना जाणूनबुजून लक्ष्य करीत आहे. अनुसूचित जमातीच्या बांधवांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनेत दिलेला त्यांचा हक्क मिळाला पाहिजे.



महादेव कोळी, टोकरे कोळी, मल्हार कोळी, मुन्नेरवारू, पान कोळी, कातकरी, वारली, भिल्ल, कोकणा हे सर्व अनुसूचित जमातीमध्येच आहेत, परंतु सरकारकडून द्वेष बुद्धीने महादेव कोळी, मल्हार कोळी, टोकरे कोळी, मुन्नेरवारू या जमातीच्या बांधवांना कोणताही लाभ मिळत नाही. त्यांच्यावर अन्याय केला जात आहे. त्यामुळे कातकरी, वारली, भिल्ल, कोकणा या जमातीप्रमाणेच महादेव कोळी, मल्हार कोळी, टोकरे कोळी, मुन्नेरवारू या जमातीतील अधिसंख्या पदावर असलेल्या कर्मचाऱ्यांना संरक्षण देऊन न्याय दिला पाहिजे, अशी मागणी आमदार रमेश पाटील यांनी सभागृहात केली. त्याचप्रमाणे राज्यातील आदिवासी बांधवांना शबरी घरकुल योजने अंतर्गत घरे उपलब्ध करून दिली जातात, परंतु गरीब व गरजू आदिवासी बांधवांना याचा लाभ मिळत नसून भलतीच लोक याचा फायदा घेत आहेत. त्यामुळे शासनाने या गोष्टीमध्ये लक्ष घालून दोषींवर कारवाई केली पाहिजे, अशी मागणी आमदार रमेश पाटील यांनी केली.

# 'डीएव्ही'च्या वाढीव फीविरोधात पालकांचे आंदोलन; तक्रारींसंदर्भात आज सुनावणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सिवूडस येथील डीएव्ही पब्लिक स्कूलने शाळेच्या फी व्यतिरिक्त अतिरिक्त फी घेऊ नये यासाठी पालकांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. मंगळवारी (दि. २२) सकाळी सर्व पालक शाळेसमोर एकवटून डीएव्ही शाळा अतिरिक्त फी का वसूल करते? याचा जाब विचारण्यासाठी जमले असता शाळेच्या मुख्याध्यापका कांचन मनोजा यांनी पालकांना वेळ देऊनदेखील भेट न दिल्यामुळे संतापलेल्या पालकांनी आपला मोर्चा नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयावर धडकवला. दरम्यान, डीएव्ही शाळा व्यवस्थापक आणि पालकांची अतिरिक्त फी व इतर तक्रारी संदर्भात सुनावणी बुधवारी (दि. २३) दुपारी २ वाजता बेलापूर येथील मुख्यालय, शिक्षण विभाग दालन येथे होणार आहे.



नेरूळमधील सीवूड्स सेक्टर ४८ येथील डीएव्ही पब्लिक शाळेची वार्षिक फी प्रती विद्यार्थी अधिकच आहे. कोरोनाच्या काळातही शाळेची फी पालक भरत आहेत, मात्र विद्यार्थ्यांची इतर फी घेऊ नये अशी पालकांची एकमुखी मागणी आहे. अतिरिक्त फी घेऊ नये यासाठी शाळेच्या शेकडो पालकांनी शाळेवर धडक देऊन निषेध नोंदवला. या वेळी भाजपचे माजी नगरसेवक भरत जाधव, भाजप युवा मोर्चा नवी मुंबई अध्यक्ष दत्ता घंगाळे, स्नेहा नाईक, रणजित निंबाळकर, आकांक्षा पाटील, मानसी राऊत यासह शेकडो पालक उपस्थित होते.

शाळा व्यवस्थापक भेट देत नसल्याने पालकांनी बेलापूर येथील मुख्यालय गाठले तेथील शिक्षण विभागाचे उपायुक्त जयदीप पवार यांची भेट घेऊन संतप्त पालकांनी आपली बाजू मांडली. दरम्यान, डीएव्ही शाळेचे संचालक आणि पालकांची बैठक बुधवारी बोलवण्यात आली असून वाढीव फी तसेच अन्य तक्रारीवर सुनावणी होणार असल्याचे उपायुक्त पवार यांनी सांगितले.

# तळोजा एमआयडीसीतील गतिरोधकांची दुरवस्था

**पनवेल : वार्ताहर**

गतिरोधकांच्या दूरवस्थेमुळे वाहनांची नासधूस होत असल्याचे प्रकार तळोजा औद्योगिक वसाहतीमधील मुख्य रस्त्यावरील प्रवासादरम्यान अनुभवायला मिळत आहे. मुख्य रस्त्यावरील गतिरोधक वेळीच दुरूस्त न केल्यास मोठा अपघात होण्याची शक्यता वाहनचालकांकडून वर्तविली जात आहे. याबाबत तळोजा वाहतूक पोलिसांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या तळोजा कार्यालयाला चार पत्र पाठविले आहे, मात्र वाहतूक पोलिसांच्या पत्राला महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून केराची टोपली दाखविली आहे.

तळोजा एमआयडीसीमध्ये अनेक कारखाने आहेत. त्यामध्ये रासायनिक




इलेक्ट्रिकल, फिशर व इतर कारखान्यांचा समावेश आहे. त्यामुळे कंपन्यांमध्ये माल उतरवण्यासाठी तसेच घेऊन जाण्याकरता मोठ्या संख्येने अवजड वाहने येतात. त्याचबरोबर एमआयडीच्या मुख्य रस्त्यावर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून गतिरोधक उभारण्यात आले आहेत, मात्र येथील सर्व गतिरोधकांची दुरवस्था झालेली आहे. त्यामुळे वाहनचालकांना गतिरोधकांचा अंदाज न आल्याने अपघाताला सामोरे जावे लागत आहे. याबाबत तळोजा वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश पाटील यांनी औद्योगिक विकास महामंडळाला एमआयडीसी हद्दीतील मुख्य रस्त्यावरील दुरवस्था झालेले गतिरोधकांची दुरुस्ती करण्यात यावी यासाठी आतापर्यंत चार पत्रे पाठविली आहेत, मात्र वाहतूक पोलिसांच्या पत्रांना केराची टोपली दाखविली आहे. या नादुरुस्त गतिरोधकांमुळे या रस्त्यावर अपघात होण्याची दात शक्यता असल्याने लवकरात लवकर गतिरोधकांची दुरुस्ती करावी, अशी मागणी वाहन चालकांनी केली आहे.

### रस्त्यावरील अपघातांना निमंत्रण

तळोजा एमआयडीसी येथील मुख्य रस्त्यावरील गतिरोधकांची दुरवस्था झालेली आहे. यामुळे या रस्त्यांवर अपघातांचे प्रमाण वाढले आहे. नुकतेच रात्रीच्या सुमारास रामकिशन चौक या ठिकाणी दुचाकीस्वार सुरेश पवार हे बेलनाका ते नावडा फाटा येत असताना गतिरोधक अर्धवस्थेत तुटलेले असल्याने त्याचबरोबर पांढरे पट्टे नसल्याने त्यांची दुचाकी घसरली व अपघात होऊन त्यात ते जखमी झाले. असे अनेक अपघात घडले आहेत.

**तळोजा एमआयडीसी येथील मुख्य रस्त्यावरील गतिरोधकांची दुरवस्था झालेली आहे. याबाबतचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविला आहे.**
**–दीपक बोबडे, डेप्युटी इंजिनिअर, महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ**

*वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी*
रामप्रहर

# वैश्वीच्या उपसरपंचपदी नूतन मुंबईकर



**उरण : रामप्रहर वृत्त**

वैश्वी ग्रामपंचायतमध्ये उपसरपंच पदावर असलेल्या सोनाली पाटील यांचा एक वर्षाचा कार्यकाळ पूर्ण झाल्याने त्यांच्या जागी उपसरपंच म्हणून नूतन प्रितम मुंबईकर यांची बिनविरोध निवड झाली. निवडणूक निर्णय अधिकारी ग्रामसेविका रेश्मा ठाकूर यांनी हे जाहीर केले.

या वेळी भाजप जिल्हा उपाध्यक्ष नीळकंठ घरत, उरण तालुकाध्यक्ष रवी भोईर, प्रभाकर मुंबईकर, शशिकांत मुंबईकर, माजी सरपंच नरेंद्र मुंबईकर, स्वाती महेंद्र मुंबईकर, शाम मुंबईकर, भाजप पूर्व विभाग अध्यक्ष शशी पाटील, युवक अध्यक्ष तेजस पाटील, विद्याधर मुंबईकर, वैजनाथ मुंबईकर, रामनाथ मुंबईकर, निलम भोईर, प्रकाश मुंबईकर, शेखर मुंबईकर, प्रताप मुंबईकर, मधुकर मुंबईकर, गजानन मुंबईकर, अरुण मुंबईकर, गणेश पाटील, मनिष मुंबईकर, अशोक पाटील, मिलिंद ठाकूर, सरपंच संदीप कातकरी, सोनाली पाटील, सदस्य ज्योत्स्ना पाटील, निकिता मुंबईकर, अजित पाटील, सुनील तांबोळी, संदीप पाटील, प्रमिला मुंबईकर आदी उपस्थित होते.

पान १ वरून

## लोकनेते रामशेठ ठाकूर विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय 'रयत'साठी आदर्श वास्तू ठरणार

भाषणाच्या सुरुवातीला बोलताना डॉ. अनिल पाटील यांनी, कर्मवीर अण्णांची समाधी आणि पुतळे आहे, मात्र शिल्प नव्हते. ७५० शाखांमध्ये नाही ते कामोठे या शाखेत उभे केले आहे. त्यामुळे लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे खास आभार मानत असल्याचे सांगितले. एक इंच जागा आणि एकही वीट जवळ नसताना कर्मवीर अण्णांनी संस्था स्थापन करण्याचे स्वप्न बघितले आणि ते प्रत्यक्षात आणले. गुणवत्तेकडे आयुष्यभर अण्णांनी लक्ष केंद्रित केले आणि आशिया खंडातील सर्वांत मोठी संस्था उदयास आली. १९९५ सालानंतर रयत शिक्षण संस्थेने विविध उपक्रम राबविले आणि त्या अनुषंगाने दर्जेदार शिक्षण देण्याचे काम करीत शिक्षण क्षेत्रातील विविध यश प्राप्त केले. आमच्याकडे पाच महत्त्वाचे घटक आहेत. त्यामध्ये कर्मवीर अण्णा, रयत प्लांट, शरद पवारसाहेब, रामशेठ ठाकूरसाहेब आणि १६ हजार रयतसेवक आहेत. त्यामुळे संस्था अधिक जोमाने काम करीत आहे. रामशेठ ठाकूर यांनी दर्जाच्या बाबतीत कधीही तडजोड केलेली नाही. म्हणूनच कामोठे विद्यालयाची ही इमारत रामशेठ ठाकूर यांच्यामुळेच डौलाने उभी राहिली आहे. आधुनिक सुविधा देण्याचा प्रयत्न करण्याबरोबरच काळाप्रमाणे चालले पाहिजे, यामुळे जगाची भाषा असलेल्या इंग्रजीला डावलून चालणार नाही. तो उद्देश भावी पिढीच्या हितासाठी असून उद्योग, व्यवसाय, नोकरी, उन्नतीसाठी महत्त्वाचा आहे. जागतिक दर्जाचे शिक्षण देणे हा रयत शिक्षण संस्थेचा मानस असून तो या कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर विद्यालयातून सुरू होत आहे, असेही डॉ. अनिल पाटील यांनी आवर्जून नमूद केले तसेच कर्मवीर अण्णांच्या पूर्णाकृती शिल्पाबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे त्यांनी आभार व्यक्त केले.

या वेळी अध्यक्षीय भाषणात लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी, आजचा दिवस माझ्या दृष्टिकोनातून महत्त्वाचा असल्याचे सांगितले. कर्मवीर अण्णांचे पूर्णाकृती शिल्प पाहून मन भरून आले आहे. असा पुतळा व्हावा अशी मनापासून इच्छा होती. ती शिल्पकृतीतून पूर्ण झाली आणि त्याचे आज अनावरण झाले. 'रयत'चे वातावरण माझ्या मनात भिनले आहे. 'रयत' माझ्या जीवनातील अविभाज्य घटक आहे. अण्णांची समाधी आणि पुतळा पाहिल्यावर धन्य वाटते, त्याप्रमाणे येथील ही शिल्प प्रतिकृती आपल्याला प्रेरणा देत राहणार आहे.

अध्यक्षीय भाषणात लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सांगितले की, या विद्यालयाच्या उभारणीत कामोठे व परिसरातील ग्रामस्थांनी कष्ट घेतले आहे. स्व. प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांच्या हस्ते या विद्यालयाच्या कामाचे भूमिपूजन झाले होते. सुरुवातीला १२ वर्गखोल्या होत्या. संस्थेने मला ही शाळा दत्तक घ्यायला सांगितली. आता हे विद्यालय पाच मजली झाले आहे. रयत शिक्षण संस्थेचे पनवेलवर विशेष प्रेम आहे. त्यामुळे पनवेल–उरणमध्ये शाखांचा विस्तार झाला असून हे विद्यालय रायगड विभागाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचे आहे. स्टेट बोर्ड आणि आणि सीबीएसई बोर्डचे हे विद्यालय सर्व सुविधायुक्त झाले आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी इंग्रजी शिक्षण वाघिणीचे दूध आहे, असे सांगत त्याचे महत्त्व पटवून दिले आहे आणि ती गरज ओळखून दर्जेदार शिक्षण देण्याचे काम केले जात आहे. सर्व समाजासाठी शिक्षण देण्याचे काम कर्मवीर अण्णांनी केले आहे. त्यामुळे अण्णांचे ऋण फेडण्याचे काम करीत राहू, असेही लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या वेळी अधोरेखित केले.

स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन आमदार प्रशांत ठाकूर यांनी सर्वांचे स्वागत केले. त्यांनी आपल्या मनोगतात म्हटले की, कामोठे परिसरात देशाच्या विविध प्रांतातील लोकं वास्तव्यास आहेत. येथील हे विद्यालय कामोठ्यापुरते मर्यादित राहिले नाही, तर त्या पार गेले आहे. खासदार शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली रयत शिक्षण संस्था कार्यरत असून लोकनेते रामशेठ ठाकूर नेतृत्वाखाली या विद्यालयाचे स्ट्रक्चर उभे राहिले आहे. येथील शिक्षणाचा दर्जा उत्तम असल्याने विद्यालयात प्रवेश घेण्यासाठी पालकांचा अट्टाहास असतो. प्रवेशाचा प्रतिसाद पाहता अनेक जणांना प्रवेश देता येत नाही. पुढच्या स्पर्धेसाठी विद्यार्थी तयार झाला पाहिजे यासाठी संस्थेची भूमिका आणि त्या निगडित सुविधा देण्याचे काम येथे होत आहे. वाढता प्रतिसाद पाहता या ठिकाणी स्टेट बोर्ड आणि सीबीएसई बोर्डासाठी स्वतंत्र इमारत उभी करण्याची गरज पडणार आहे. यासाठी ग्रामस्थांचे आणि संस्थेचे सहकार्य महत्त्वाचे ठरणार आहे. मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य आर. डी. गायकवाड हे ८७ वर्षीय आहेत. अगदी या वयातही त्यांना स्वतःपेक्षा संस्थेच्या विकासही काळजी आहे, म्हणून ते सातारा येथून कामोठे येथे कार्यक्रमाला उपस्थित राहिले असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी आवर्जून नमूद केले व त्यांच्या प्रती आदर व्यक्त केला.

संस्थेचे उपाध्यक्ष भगिरथ शिंदे यांनी आपल्या भाषणातून सांगितले की, लोकप्रतिनिधी सतत समाजाच्या विकासासाठी तत्पर आणि जागृत असतो तेव्हाच त्याला जनप्रतिसाद लाभतो आणि विशेषतः महाराष्ट्रातील सर्वांत मोठा असलेल्या विधानसभा मतदारसंघात निवडून येणे खाण्याचे काम नाही, तर तारेवरची कसरत आहे, मात्र आमदार प्रशांत ठाकूर सतत सर्व समाजासाठी काम करीत असतात. म्हणूनच हे नेतृत्व सर्वांत मोठ्या मतदारसंघातून सहज विजयी होतात. त्यामुळे आमदार प्रशांत ठाकूर यांचे अभिनंदन करू तेवढे कमी आहे. विद्यार्थी आणि पालकांची काळजी असणारे ते आहेत. त्यामुळे आमदार प्रशांत ठाकूर यांचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. शिक्षणाशिवाय पर्याय नाही हे कर्मवीर अण्णांना उमगले. म्हणून त्यांनी शिक्षण संस्था स्थापन केली. 'रयते'विषयी जीवापाड प्रेम असलेले रामशेठ ठाकूर यांचे नेतृत्व संस्थेत आले आणि संस्थेचे रूप विकासात पालटले. त्यांची स्वतःची जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था असतानाही प्रथम 'रयत'ला भरभरून दिले. मोखाड्यातील विद्यालयाला रामशेठ ठाकूर यांचे नाव देण्याचे आम्ही ठरवले, मात्र रामशेठ ठाकूर यांनी माझे नाव नको असे स्पष्ट सांगत आपल्या मनाचा मोठेपणा नेहमीप्रमाणे दाखवून दिला. 'रयत'चे आधारस्तंभ म्हणून ते कार्यरत असून 'रयत'साठी त्यांनी मोठे योगदान दिले. रामशेठ ठाकूर यांच्या पावलावर पावले ठेवून त्यांचे कुटुंबीय आणि सहकारी काम करीत आहेत, असेही शिंदे यांनी नमूद केले.

या समारंभाचे प्रास्ताविक संस्थेचे सचिव विठ्ठल शिवणकर यांनी केले, तर उपस्थितांचे आभार लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूलच्या प्राचार्य स्वप्नाली म्हात्रे यांनी मानले.

**अण्णांची शिल्प प्रतिकृती आपल्याला प्रेरणा देत राहील –लोकनेते रामशेठ ठाकूर**

या वेळी अध्यक्षीय भाषणात लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी, आजचा दिवस माझ्या दृष्टिकोनातून महत्त्वाचा असल्याचे सांगून म्हटले की, कर्मवीर अण्णांचे पूर्णाकृती शिल्प पाहून मन भरून आले आहे. असा पुतळा व्हावा अशी मनापासून इच्छा होती. ती शिल्पकृतीतून पूर्ण झाली आणि त्याचे आज अनावरण झाले. 'रयत'चे वातावरण माझ्या मनात भिनले आहे. 'रयत' माझ्या जीवनातील अविभाज्य घटक आहे. अण्णांची समाधी आणि पुतळा पाहिल्यावर धन्य वाटते, त्याप्रमाणे येथील हे शिल्प प्रतिकृती आपल्याला प्रेरणा देत राहणार आहे.

**आजच्या काळाला अनुरूप शिक्षण देण्याचे काम रयत शिक्षण संस्था करीत आहे. सर्वसामान्य घरातील विद्यार्थ्याला इंग्रजीचे शिक्षण मिळाले पाहिजे हा उद्देश घेऊन आणि नवनवीन आव्हान पेलण्याचे काम संस्था करीत आहे.**

**–आमदार प्रशांत ठाकूर, चेअरमन, स्थानिक स्कूल कमिटी**

## संतप्त न्हावा ग्रामस्थांची सिडको भवनवर धडक; अधिकाऱ्यांना घेराव

त्या वेळी अधिकाऱ्यांकडून न्हावा ग्रामपंचायतीच्या हद्दीतील ग्रामस्थांना दररोज पाच तास पाणी करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. यानंतरही पाणीपुरवठ्याची समस्या कायम राहिल्याने आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांच्या नेतृत्वाखाली सिडको भवनात पाणी प्रश्नावर बैठक घेण्यात आली होती. या बैठकीनंतर गव्हाण शिवाजीनगर येथील जलवाहिनीमधून आठ इंच व्यासाची नवीन जोडणी टाकण्यात आली आहे, मात्र त्यानंतरही पाण्याची समस्या सुटलेली नाही.

न्हावा गाव उंचावर असल्यामुळे पाणी पंपाने साठवणूक टाकीत सोडावे लागते. त्यानंतरच ग्रामस्थांना पाणी वितरण केले जाते, मात्र मुळातच पाणीच मिळत नसल्याने पाणी साठवून टाकीत सोडणार कुठून आणि ग्रामस्थांना पाणीपुरवठा कसा करणार असा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. सिडकोकडून पाणीपुरवठाच सुरळीत होत नसल्याने ग्रामस्थांना १५ दिवसांत फक्त अर्धा तासच पाणीपुरवठा होत असल्याची माहिती सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे यांनी दिली.

पाणीटंचाईचे संकट दूर करण्याच्या मागणीसाठी संतप्त झालेल्या न्हावा ग्रामस्थांनी सोमवारी सिडको भवनावर धडक दिली. इतक्यावरच न थांबता महिलांसह संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना घेराव घालून पाणीपुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली.

या सर्वपक्षीय आंदोलनात सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, उपसरपंच मंजुषा ठाकूर, माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे, जागृती ठाकूर, माजी उपसरपंच किसन पाटील, ग्रामसुधारणा मंडळाचे अध्यक्ष शैलेश पाटील, महिला मंडळ अध्यक्ष मिनाक्षी पाटील, शांता म्हात्रे आणि सुमारे २५० ग्रामस्थ उपस्थित होते. यामध्ये महिलांची संख्या लक्षणीय होती. या वेळीही अधिकाऱ्यांनी पुन्हा एकदा पाणीपुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन दिले आहे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E –TENDER NOTICE EXTENSION**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender / Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No :- EE/EHV (O&M)/DIVN/MHD/ Tech/Tender-33/2021-22 Dtd. 15.03.2022 RFX No. 7000022555** | **Sub. : Extension** for SRM E-Tender for the work of shifting of centralized AC Duct as well as electrical wiring renovation work at 220 kV Mahad S/s under EHV (O&M) Dn. Mahad. | **Rs. up to 9,66,724/- (Including GST + 1% Labour CESS)** |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/- plus GST + 1% Labour CESS.
Bid submission is from 23.03.2022 @ 00:00 hrs. to 29.03.2022 @ 23:59 Hrs. for above tender.
For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The Addl. Executive Engineer, (O) : Phone No. 7373101089
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**Sd/-**
**(Sanjay O. Katkar)**
**Executive Engineer, EHV (O&M) Dn, Mahad**




पनवेल भाजपतर्फे
**जनहितार्थ**
माहितीसाठी

**पनवेल महानगरपालिका हद्दीत**
**बुधवार, दि. २३ मार्च २०२२ रोजी होणारे**
**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**
**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

**कोविशिल्ड**

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी–१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल
- ३. यूपीएचसी–४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी–५, डी–मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी–६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
- ६. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर

**कोव्हॅक्सिन**

- ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली (१५+ व १८+)
- ८. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल (१५+ )
- ९. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल (१५+)
- १०. यूपीएचसी–५, डी–मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर (१५+)

**कार्बेव्हॅक्स**

- ११. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल (१२ ते १४)

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पुर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**

## निवडक

### पार्क केलेल्या गाडीतून लॅपटॉपची चोरी

**पनवेल :** पार्क करून ठेवलेल्या गाडीतून सव्वा लाख रुपयांच्या लॅपटॉपची अज्ञाताने चोरी केली. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खारघर सेक्टर १०, येथील सौम्यअंशू सूर्यान्शु सरकार यांनी त्यांची कार पार्क करून ठेवली होती. बिल्डिंगच्या खाली आल्यावर ते लॅपटॉप घेण्यास गेले असता कारच्या मागील बाजूच्या उजव्या बाजूचा दरवाजा उघडा असल्याचे त्यांना दिसले. अज्ञात चोरट्याने लॅपटॉपची चोरी केली.

### तळोजा परिसरात आढळला मृतदेह

**पनवेल :** तालुक्यातील तळोजा फेज सेक्टर ११ परिसरात एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाइकांचा शोध तळोजा पोलीस करीत आहेत. मयत व्यक्तीचे अंदाजे वय ५५ वर्षे आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास तळोजा पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरीक्षक अनंत लांब यांच्याशी संपर्क साधावा.



**पनवेल :** नाट्यदिग्दर्शक मोहन हिंदुपूर यांच्या वयाच्या षष्ठ्यब्दीपूर्तीनिमित्त नवीन पनवेल येथील जागृती प्रकल्प या ठिकाणी अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.




**पनवेल : ॲमिटी युनिव्हर्सिटी मुंबईच्या स्कूल ऑफ लँग्वेजेसच्या हेड ऑफ द इन्स्टिट्युशन डॉ. मंजिरी वैद्य यांना उच्चशिक्षण क्षेत्रात मोलाचे योगदान दिल्याबद्दल आयटीएम, खारघर या संस्थेतर्फे गौरविण्यात आले.**

# पनवेलमध्ये कातकरी उत्थान अभियान

## सप्तसूत्री कार्यक्रमाद्वारे विविध योजनांचा लाभ

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल मधील क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे जिल्हाधिकारी कार्यालय रायगड-अलिबाग यांच्या विद्यमाने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवनिमित्ताने जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतील कातकरी उत्थान अभियानांतर्गत सप्तसूत्री कार्यक्रमाद्वारे विविध योजनांचा लाभ वाटप कार्यक्रम झाला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय आयुक्त कोकण विभाग, विलास पाटील हे होते तर जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, अलिबाग उपवनसंरक्षक आशिष ठाकरे आणि पनवेल महानगरपालिका आयुक्त गणेश देशमुख यांच्या हस्ते हे लाभ वाटप करण्यात आले.

कातकरी जमात ही नामशेष होण्याच्या मार्गावर असुन या जमातीला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ही सप्तसुत्री आखली आहे. जिल्हाभरात आदिवासींना ३१ हजार वेगवेगळे दाखले उपलब्ध करून देण्यात आले आहेत, असे जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी या वेळी सांगितले.




> पनवेल तालुक्यात ३३०० जातीचे दाखले तयार करून देण्यात आले आहेत. त्यापैकी ७०० दाखल्यांचे वितरण आज करण्यात आले. तसेच उरण, कर्जत, खालापुर तालुक्यात मोठ्या प्रमाणात दाखल्यांचे वाटप करण्यात आले आहे. पनवेल, उरणचा विचार करता ७००० दाखले तयार करण्यात आले आहेत.
> –विजय तळेकर, तहसीलदार, पनवेल

# चिंध्रणमध्ये शेतकऱ्यांना व्यवसाय साहित्य व विद्यार्थ्यांना खेळणी वाटप





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपचे उत्तर रायगडचे जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नाने भाजपचे ओबीसी सेल रायगड जिल्हा अध्यक्ष एकनाथ देशेकर व चिंध्रण ग्रामपंचायतीच्या सरपंच कमला देशेकर यांनी चिंध्रणमध्ये शेतकऱ्यांना व्यवसाय साहित्य व विद्यार्थ्यांना खेळणी वाटप करण्यात आली. दीपक फर्टिलासर ॲण्ड पेट्रोकेमिकल कॉर्पोरेशन लिमिटेड संचलित ईशान्य फाउंडेशन पाले खुर्द यांच्या सहकार्याने व ज्ञानम कार्यक्रम अंतर्गत हा उपक्रम राबविण्यात आला.

महिला आरोग्य जागृती कार्यक्रम आणि कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत व्यवसाय साहित्य वाटप कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच कमला एकनाथ देशेकर, दीपक फर्टीलायझरच्या एव्हीपी जयश्री

### देशेकर दाम्पत्याचा कौतुकास्पद उपक्रम

काटकर, सीएसआर मॅनेजर संदीप काकडे उपस्थित होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून योगा प्रशिक्षक डॉ. रीचा भार्गव यांनी महिलांच्या आरोग्यासाठी योगा किती महत्त्वाचा आहे त्याचे महत्त्व सांगून प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सर्व महिलांना करून आपल्या दैनंदिन कामात योगा करून आपले आरोग्य निरोगी व सशक्त ठेवण्यासाठी योगाचा उपयोग आपण करू शकतो, असे सांगितले. बेलापूरच्या ज्योती कलश संस्थेच्या डायरेक्ट अमिता नील यांनी महिलांच्या आरोग्या संबंधित सॅनिटरी पॅडचा उपयोग व वापर कशा पद्धतीने करायचा आणि कोणत्या प्रकारचे पॅड वापरावे या संबंधित मार्गदर्शन करून पॅडमुळे होणारे फायदे तोटे आणि पेड डिस्पोजल करण्याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. या वेळी जयश्री काटकर यांनी योगाचे आपल्या दैनंदिन जीवनात आणि सेंटर पॅडचे आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या गोष्टींवर महिलांसोबत चर्चा केली.

सर्व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत पिठाची गिरणी, पेंटिंग साठी कॉम्प्रेसर आणि इलेक्ट्रिशन साहित्य संच चिंध्रण व पाले खुर्द येथील लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी महोदर कुत्तरपाडा चिंचवली महाळुंगी चिंध्रण, पाले खुर्द येथील महिला उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ईशान्य फाउंडेशनमार्फत योगेश पाटील यांनी केले. ज्योतिष शास्त्र तज्ञ जयंत कुलकर्णी, हरीश सचदेव यांची उपस्थिती लाभली.

# सीआयएसएफ कर्मचाऱ्यांसाठी आर्ट ऑफ लिव्हिंग शिबिर

**उरण : वार्ताहर**

केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल युनिट ओएनजीसी मुंबईच्या उरण कंटींजेन्टमध्ये आर्ट ऑफ लिव्हिंगचे शिबिर उत्साहात झाले. शिबिराचे उद्घाटन सोमवारी (दि. २१) सीआयएसएफ युनिट ओएनजीसी मुंबईचे कमांडेंट ललित शेखर झा यांच्या हस्ते दिप प्रज्वलीत करून करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये सीआयएसएफ मुंबई रिजनचे विविध युनिटमधील जवान सहभागी झाले. हे शिबिर शनिवारी (दि. २६) पर्यंत चालणार आहे.

आर्ट ऑफ लिव्हिंग म्हणजे एक तंत्र आहे ज्याद्वारे तणाव आणि चिंता दूर करून जीवनात आनंद आणि आनंद आणण्याची कला शिकली जाते. आज देशात आंतरिक सुरक्षा ड्यूटी, इलेक्शन ड्यूटी, कायदा आणि सुव्यवस्था ड्यूटी यामध्ये केंद्रीय सशस्त्र बलाचा फार मोठ्या प्रमाणात सहभाग असतो. त्यामुळे जवानांनवर कामाचा फार ताण पडतो. यासाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आल्याचे सांगण्यात आले.



# शिवजयंतीनिमित्ताने अन्नदान सप्ताह

**नवी मुंबई : बातमीदार**

कोपरखैरणे येथील सिद्धीविनायक प्रतिष्ठानच्या वतीने शिवजयंतीनिमित्त कोपरखैरणे सेक्टर १ येथील बाल आश्रम, वृद्धाश्रम, झोपडपट्टीतील गरजूंना अन्नदान करण्यात आले. सप्ताहाचे आयोजन करून वेगवेगळ्या ठिकाणी प्रतिष्ठानच्या सदस्यांकडून अन्नदान करण्यात आले.

सिद्धीविनायक प्रतिष्ठानच्या वतीने शिवजयंती निमित्ताने दरवर्षी सारखी मिरवणूक न काढता अनाथ बालके, वृद्धांना तसेच झोपडपट्टीमधील गरजूंना अन्नदान करण्याचा कौतुकास्पद निर्णय घेण्यात आला. १५ ते २१ मार्चपर्यंत अन्नदान सप्ताह झाला.

यामध्ये कोपरखैरणे येथील माहेर आश्रम, स्वीट ऑल्डेज होम वृध्दाश्रम,आधारवड वृद्धाश्रम अपंग संस्था, कोपरखैरणे आणि शहरातील उड्डाणपूल, झोपडपट्टीत राहणाऱ्या नागरिकांना आठवडाभर अन्नदान करण्यात आले.



# केबीपी कॉलेजतर्फे श्रमदान, बौद्धिक शिबिर

**नवी मुंबई : बातमीदार**

रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील (केबीपी) कॉलेजमधील राष्ट्रीय सेवा योजनेचे सात दिवसीय निवासी शिबिर १३ ते १९ मार्च रोजी सिध्दी करवले येथे आयोजित करण्यात आले होते. यादरम्यान स्वच्छता अभियान, श्रमदान, बौद्धिक व्याख्याने, सर्वे, इतर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

१३ मार्च रोजी नवी मुंबई लाइन्स क्लबच्या अंकान शहा यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी डॉ. गवळी यांनी सात सात दिवस कोणते उपक्रम राबवणार आहेत यांची माहिती दिली. १४ मार्च रोजी रायगड जिल्हा परिषद शाळेतील कोविडमुळे बंद असलेले काही शाळेचे वर्ग स्वच्छता करून शाळा विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आली. शाळेच्या परिसरात स्वच्छता करून फुलझाडांची रोपे लावून शाळा सुशोभित करण्यात आली. तिसऱ्या दिवशी गावातील व मंदीर परिसरात स्वच्छता करण्यात आली. चौथ्या दिवशी ग्रामस्थांसाठी मोफत डोळे तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. पाचव्या दिवशी वीट भट्टी कामगार आदिवासी विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करण्यात आले व तेथील मुलांना वपालकांना शिक्षणासाठी प्रेरित करण्यात आले. तसेच स्वयंसेवकाद्वारे तयार करण्यात आलेले सोलार स्टडी सोलार स्टडी लंप तेथील गरजू विद्यार्थ्यांना देण्यात आले. सहाव्या दिवशी गावाच्या शेजारी मोठा कचरा डेपो असल्यामुळे गावाच्या परिसरातील पाणी आणि माती परीक्षण करण्यात आले. यासोबतच दररोज बौद्धिक विषयांवर व्याख्याने आयोजिली होती. सायंकाळी वादविवाद स्पर्धा व रात्री सांस्कृतिक कार्यक्रम असे दिनचर्य होते.

या संस्कार शिबिराच्या समारोप समारंभाच्या वेळी नवी मुंबई महानगरपालिका माजी विरोधी पक्षनेते व नवी मुंबई पुनर्वसन सामाजिक संस्थेचे संस्थापक आणि अध्यक्ष दशरथ भगत यांनी विद्यार्थ्यांनी केलेल्या समाजसेवेचे समाजसेवेची प्रशंसा केली. यासोबतच समाजसेवेत कार्य करण्यासाठी सर्व परी सहकार्य करण्याचे आश्वासन ग्रामस्थांना दिले. मनोज महाराणा काही माझी विद्यार्थी उपस्थित होते. महाविद्यालयातील शिक्षकांनी शिबिरास भेट दिली.

सदर शिबिर महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. शुभदा नायक, राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रकल्प अधिकारी व चेअरमन डॉ. एल. व्ही. गवळी, प्रा. पि. जी. भाले, प्रा. एन. बी.नलावडे, प्रा. अमित सुर्वे व शिबिरार्थी उपस्थित होते. अशी माहिती राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रतिनिधी रोहित मांजरेकर आणि भाग्यश्री रांजणे यांनी दिली.



**पनवेल : छत्रपती शिवाजी महाराज यांची तिथीप्रमाणे जयंती सोमवारी मोठ्या उत्साहात साजरी झाली. त्यानिमित्त तालुक्यातील सोमाटणे येथे दरवर्षीप्रमाणे शिवजयंती साजरी झाली. यंदाचे हे पाचवे वर्ष होते. या वेळी गणेशमूर्ती आणि शिवमूर्तीचे पूजन करून शिवपालखीची भव्य मिरवणूक काढण्यात आली होती तसेच शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.**

# पिल्ले कॉलेजमध्ये युफेरीया जल्लोष

## अभिनेत्री किशोरी शहाणे यांची उपस्थिती

**रसायनी : प्रतिनिधी**

येथील पिल्ले कॉलेजमध्ये झालेल्या युफेरीया जल्लोषमध्ये प्रसिद्ध अभिनेत्री व नाट्य कलाकार किशोरी शहाणे यांनी सहभाग घेतला होता. त्यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात केली.

कार्यक्रम अतिशय उत्तम प्रकारे सादर करण्यात आला. या वेळी ढोल पथकाचा कार्यक्रम तसेच विविध प्रकारच्या कला सादर करण्यात आल्या. कॉलेजने कला ॲकॅडमी सुरू करावी व मुलांनी सर्व प्रकारच्या कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे शहाणे यांनी सांगितले.

डान्स कार्यक्रमासाठी शिव ठाकरे हे परीक्षकांच्या भूमिकेत होते. या वेळी कॉलेजच्या लता मेनन व निवेदीता श्रेयास मॅडम व कॉलेजचा सर्व स्टाफ व युफेरीया या टीमचे सर्व सदस्य, कार्यकर्ते उपस्थित होते.



# छावा फाउंडेशनतर्फे एचआयव्हीग्रस्त मुलांसाठी करिअर मार्गदर्शन



**पनेवल : रामप्रहर वृत्त**

कामोठे येथील छावा फाउंडेशन ट्रस्टतर्फे एचआयव्हीग्रस्त मुलांसाठी रविवारी (दि. २०) अकुर्ली नवीन पनवेल येथे करिअर मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरासाठी विद्यार्थी सुनीलकुमार पंडा प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.

मार्गदर्शन शिबिराचा ५० मुलांनी लाभ घेतला. सुनीलकुमार पंडा यांनी आपल्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास जागवला. शिबिरादरम्यान मुलांना नाष्टा आणि जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती. चांगले भविष्य हे प्रत्येक लहान मुलाचा हक्क आहे आणि समाजातील वंचित मुलांसाठी प्रत्येकाने केलेल्या लहानशा योगदानाने खूप फरक पडू शकतो, असे प्रतिपादन संस्थेचे अध्यक्ष दामोदर बाजीराव चव्हाण यांनी केले. त्यांच्यासोबत विविध उपक्रमाच्या यशस्वितेसाठी संस्थेचे उपाध्यक्ष सचिन तांबोली, सचिव शेखर जगताप, खजिनदार सायली चव्हाण, सदस्य मीना यादव, निलेश घारे, कविता दुराईराज, सौरिष दुराईराज, काजल अवताडे, सुशांत अवताडे, कैलाश कौशिक, दिनेश यादव, सोनाली कौशिक, संगीता यादव, सागर नरसाळे, आदित्य नरसाळे, प्रवीण डोंगरे यांनी विशेष मेहनत घेतली.

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : १३

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सॲप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी फेब्रुवारी २०१९ पासून देशातील किती शेतकरी कुटुंबांना मिळतो आहे?**
***अ.)*** १२ कोटी ***ब.)*** ५ कोटी ***क.)*** ८ कोटी ***ड.)*** १० कोटी

**२. भारतीय पासपोर्टधारक जगातील किती देशांना आता व्हिसाशिवाय भेट देऊ शकतात?**
***अ.)*** ५९ देश ***ब.)*** ४० देश ***क.)*** ३० देश ***ड.)*** १० देश

**३. आधार कार्डधारक नागरिकांची संख्या सध्या (फेब्रुवारी २०२२) किती आहे?**
***अ.)*** १४० कोटी ***ब.)*** १२० कोटी ***क.)*** १३२ कोटी ***ड.)*** १०० कोटी

Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka,Old Panvel, Pin - 410 206.

**टीप : वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.**

***...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!***

## संपादकीय

# ऐतिहासिक वाद

भाजपचे ज्येष्ठ नेते सुधीर मुनगंटीवार यांनी सोमवारी विधिमंडळात शिवजयंतीचा मुद्दा उपस्थित केला. शिवसेना पक्षप्रमुखांपासून सर्व जण तिथीनुसार शिवजयंती साजरी करण्याच्या मन:स्थितीत असताना सरकारतर्फे अधिकृतरित्या ती तिथीला साजरी का केली जात नाही, असा सवाल त्यांनी केला. त्यांच्या प्रश्नामुळे सत्ताधारी आघाडी पार चक्रावून गेली. याला उत्तर काय द्यायचे? अखेरीस तुमच्या पाच वर्षांच्या सत्ताकाळात तुम्ही शिवजयंती तिथीनुसार साजरी का केली नाही, असा प्रतिसवाल करत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शासननिर्णयाचे कारण पुढे केले.

**जगातील सर्वांत मोठी लोकशाही म्हणून लौकिक प्राप्त असलेल्या आपल्या भारत देशात कुठल्याही मुद्द्यावर वाद निर्माण होऊ शकतो. वाद नसेल तर तो उकरून काढला जातो किंवा नव्या वादाला जन्म दिला जातो. लोकशाहीचे हे वैशिष्ट्यच आहे. तथापि या वादाला नळावरच्या भांडणाचे स्वरूप येऊ लागले की समाजाची वीण उसवू लागते किंवा समाजा-समाजांमध्ये निष्कारण तणाव निर्माण होतात. अर्थात मतपेटीचे राजकारण ओळखणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांना असले वाद उपकारकच ठरत असतात. वाद-चर्चेने राष्ट्राची वृद्धी होते हे खरे असले तरी परस्परांच्या श्रद्धास्थानांचा किंवा मतेमतांतरांचा आदर ठेवूनच वाद-चर्चा घडली तरच राष्ट्रउभारणीस पोषक वातावरण निर्माण होऊ शकते. शिवजयंती ग्रेगरियन कॅलेंडरनुसार (इंग्रजी कालमानानुसार) १९ फेब्रुवारी रोजी साजरी करावी की तिथीनुसार फाल्गुन कृष्ण तृतियेस साजरी करावी हा आपल्याकडील जुना वाद आहे. मुळात इतिहासकारांमध्ये हा वाद पूर्वापार चालू आहे. महाराष्ट्र सरकारने मात्र फार पूर्वीच इंग्रजी कालमानानुसार १९ फेब्रुवारी ही तारीख शिवजयंती म्हणून अधिकृत मानली. छत्रपती शिवाजी महाराज हे युगपुरुष होते. त्यांच्या कर्तृत्व आणि पराक्रमाची गाथा सातासमुद्रापार पोहचली. अशा या युगपुरुषाचे पुण्यस्मरण जागतिक पातळीवर व्हावयाचे असेल तर इंग्रजी कालमानानुसार १९ फेब्रुवारी हीच तारीख योग्य आहे असे तेव्हाच्या धोरणकर्त्यांचे मत पडले. त्यात काही अंशी तथ्यदेखील आहे, परंतु शिवछत्रपती हे तर महाराष्ट्राचे दैवत मानले जाते. त्यांना मराठी घराघरांत आणि मनामनांत ईश्वराचे स्थान देण्यात आले आहे. देवदेवतांच्या जयंतीचे दिवस आपण सणासारखे साजरे करतो. हे सण आणि एकूण सर्वच सणवार हिंदु पंचांगाप्रमाणे तिथीनुसार साजरे केले जातात. छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्मदिवस हा तिथीनुसार सणासारखा साजरा व्हावा, अशीही आग्रही मागणी गेली अनेक दशके केली जात आहे. यंदा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे सर्वेसर्वा राज ठाकरे यांनी तिथीनुसार शिवजयंती झोकात साजरी करण्याचा आदेश दिला होता. त्यानुसार सोमवारी दादरच्या शिवाजी पार्क येथे मनसेतर्फे ढोल-नगाऱ्यांच्या दणदणाटात शिवजयंतीचा उत्सव साजरा झालादेखील. खुद्द मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आंतरराष्ट्रीय विमानतळावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून मनोभावे वंदन केले. भारतीय जनता पक्षाच्या अनेक लहानथोर नेत्यांनी आपापल्या मतदारसंघात तसेच मंत्रालयानजिकच्या शिवप्रतिमेचे दर्शन घेतले. खरे तर हा संपूर्ण वादच निरर्थक आहे. छत्रपती शिवरायांच्या पुण्यस्मरणासाठी वर्षाचे ३६५ दिवस खुले आहेत. या युगपुरुषाचा जन्मदिन तिथीने साजरा करावा की तारखेनुसार या वादापेक्षा त्यांची शिकवण आपल्या अंगी कशी बाणवता येईल याचा विचार होणे सर्वांत इष्ट आहे. दुर्दैवाने राजकारणाच्या खेळातून आपले युगपुरुष आणि थोर विभूती मोकळे सुटत नाहीत हेच खरे.**

# पनवेल महापालिका हद्दीतील पदपथावर अवैध पार्किंग

**खबरबात**
**नितीन देशमुख**




पनवेल महानगरपालिका हद्दीत पदपथावरील दुचाकी आणि शोरूमसमोरील चारचाकी वाहनांच्या अवैध पार्किंगमुळे सर्वसामान्य जनता हैराण झाली आहे. ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना रस्त्यावरून चालताना त्रास होत आहे. एखादा अपघात झाल्यावरच त्यावर कारवाई होणार का असा प्रश्न नागरिक विचारात आहेत.

नवीन पनवेलमध्ये पूल ओलांडून आल्यानंतर एचडीएफसी सर्कलला रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या रस्त्यावर आयडीबीआय, आयसीआयसीआय बँक आणि पहिल्या मजल्यावर स्टेट बँक ऑफ इंडियासमोर एचडीएफसी बँक आहे. या बँकांची एटीएम तेथेच तळमजल्यावर आहेत. येथील संपूर्ण फुटपाथवर दुचाकी वाहने उभी केलेली असतात. याठिकाणी सिग्नलवरून येणाऱ्या गाड्या भरधाव वेगाने येत असल्याने रस्त्यावरून चालणे म्हणजे अपघातला आमंत्रणच आहे. फुटपाथवर दुचाकी उभ्या असल्याने चालायला रस्ताच नसतो. अनेक वेळा स्टेट बँकेच्या एटीएमच्या दरवाजातही दुचाकी उभ्या करून ठेवलेल्या असतात त्यामुळे एटीएममध्ये जाणे ग्राहकाला अवघड जाते. या अडचणीचा फायदा गुन्हेगार घेऊ शकता. पैसे काढून बाहेर पडणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना लुटण्याचा धोका संभवतो.

नवीन पनवेलमध्ये एचडीएफसी सर्कलला मोटारसायकल व स्कूटरवर वाहतूक पोलिसांनी कारवाई केल्यावर त्या ठिकाणी आता सायकल उभ्या करून ठेवण्यास सुरुवात झाली आहे. आयप्पा मंदिराजवळ तर एका चारचाकीच्या मालकाने गाडीच्या मागच्या व पुढच्या चाकाला वाहतूक पोलीस लावता तसे जामर लावून गाडी उभी करून ठेवलेली असते. रेल्वे स्टेशन जवळील रस्त्यावर आणि फुटपाथवर दुचाकी वाहने उभी केलेली असतात. त्याठिकाणी रस्ता अरुंद असल्याने नागरिकांना चालणे अवघड झाले आहे. संध्याकाळी रस्त्यावरून भरधाव जाणाऱ्या रिक्शा व दुचाकी यामुळे ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना रस्त्यावरून चालताना त्रास होतो. याबाबत वाहतूक शाखा कोणतीही कारवाई करताना दिसत नाही.

पनवेल शहरातून जाणाऱ्या महामार्गावर दोन्ही बाजूला अनेक दुचाकी आणि चारचाकी गाड्यांची शोरूम आहेत. या शोरूमसमोरील पदपथावर विक्रीसाठी असलेली वाहने उभी करून ठेवतात. त्यामुळे नागरिकांना मुख्य रस्त्यावरून चालावे लागते. भरधाव येणाऱ्या वाहनांमुळे तेथे अपघातही होतात. ७ डिसेंबर २०१८ रोजी महापौर डॉ. कविता चौतमोल यांनी तत्कालीन उपमहापौर चारुशीला घरत, नगरसेवक अनिल भगत आणि तत्कालीन वाहतूक शाखेचे निरीक्षक विजय कादबने यांच्या उपस्थितीत शोरूमवाल्यांची बैठक घेऊन महापालिकेने पदपथ नागरिकांसाठी मोकळे करण्याचा निर्णय घेतला असल्याने तुम्ही आपल्या शोरूमसमोरील गाड्या न हलवल्यास कारवाई करण्याचा इशारा दिला होता. यावेळी महापौरांनी महापालिका शोरूमवाल्यांकडून गाडी उभी केलेल्या जागेचे भुईभाडे घेईल व वाहतूक पोलीस त्यांचा वेगळा दंड आकारतील असे संगितले होते. गाडी उचलून नेताना गाडीचे नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी शोरुमवाल्यांची राहील असेही स्पष्ट केले होते. पण आजपर्यंत अशी कोणतीही कारवाई झालेली नसल्याने त्यांच्या गाड्या पदपथावरच उभ्या आहेत.



*पनवेल रेल्वे स्टेशनकडे जाताना रस्ता व पदपथावर स्कूटर उभ्या असतात, त्यामुळे येथून चालताही येत नाही. संध्याकाळी रस्त्यावर गर्दी असते, त्यावेळी रिक्षा, स्कूटर यांच्या गर्दीतून वाट काढत आम्हा महिलांना जावे लागते. अशावेळी रिक्षा, स्कूटरचा धक्का लागला तरी त्याकडे दुर्लक्ष करावे लागते.*

*-श्रध्दा पटेल, नवीन पनवेल*

*महामार्गावरील शोरूमसमोरील पदपथावर विक्रीसाठी असलेली वाहने उभी करून ठेवली जातात. पनवेल महापालिकेने त्यांच्यावर कारवाई करण्याचे सांगितल्यावर त्याबाबत संबंधीत शोरूमवाल्यांना नोटीस दिली होती. त्यांनी, आम्ही गाड्या उभ्या करीत असलेली जागा ही एमआयडीसीची आहे. त्या जागेशी महापालिकेचा संबंध नाही, असे पत्र आम्हाला दिले आहे. नवीन पनवेलमध्ये पदपथावरील दुचाकी वाहनांवर कारवाई केल्यानंतर त्या ठिकाणी सायकली उभ्या करण्यात येत आहेत. त्यांच्यावरही कारवाई करण्यात येईल.*

*-संजय नाले, वरिष्ठ निरीक्षक, वाहतूक शाखा, पनवेल*

# अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात आता अँजिओग्राफी, कॅन्सर निदानही होणार



**अलिबाग : प्रतिनिधी**

आरसीएफ कंपनीने आपल्या सामाजिक दायित्व (सीएसआर) निधीतून अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात कॉन्ट्रास्ट प्रेशर इंजेक्टर यंत्र उपलब्ध करून दिले आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील रुग्णांना हृदय विकारावरील अँजिग्राफी किंवा कॅन्सरसारख्या आजाराचे निदान करण्यासाठी आता मुंबईत जावे लागणार नाही.

कॉन्ट्रास्ट प्रेशर इंजेक्टर यंत्राचे लोकार्पण मंगळवारी (दि. २२) जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने याच्या हस्ते करण्यात आले. शासकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता महेंद्र कुरा, उपजिल्हा शल्यचिकित्सक डॉ. प्रमोद गवई, क्ष किरण विभाग प्रमुख सुहास ढेकणे, आरसीएफ जनसंपर्क अधिकारी संतोष वझे यांच्यासह परिचारिका, डॉक्टर, कर्मचारी या वेळी उपस्थित होते.

शरीरात रक्तभिसरण क्रिया सुरू असताना काही वेळा रक्ताच्या गाठी तयार होऊन हृदयविकार उत्पन्न होतो. हृदयाच्या आजाराचे अथवा कॅन्सर किंवा पोटातील आजाराचे निदान करण्याची सुविधा रायगडात उपलब्ध नाही. अँजिओग्राफी, कॅन्सरसारख्या आजाराचे निदान करण्यासाठी मुंबई, पुणे या शहरात जावे लागते. यासाठी हजारो रुपये खर्च करावा लागतो. या आजाराचे निदान करणे खर्चिक असल्याने अनेकजण त्याकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे अनेकांना आपले प्राणही गमवावे लागतात.

आरसीएफ कंपनीने आपल्या सामाजिक दायित्व निधीतून सहा लाखाची कॉन्ट्रास्ट प्रेशर इंजेक्टर यंत्र अलिबाग येथील जिल्हा सामान्य रुग्णालयाला दिले. हे यंत्र चालविण्यासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयातील क्ष किरण विभागातील चार जणांना जेजे रुग्णालय मुंबई येथे प्रशिक्षण दिले आहे. त्यामुळे प्रशिक्षित कर्मचारीही उपलब्ध आहेत. सिटीस्कॅनच्या माध्यमातून रुग्णाला या मशीनद्वारे इंजेक्शन देऊन त्याच्या आजाराचे निदान काही वेळातच कळणार आहे. त्यामुळे त्या रुग्णाला त्वरित पुढील उपचार मिळणार आहेत. रायगडात खाजगी रुग्णालयात ही सुविधा काही प्रमाणात असली तरी ती खर्चिक असल्याने सर्वसामान्यांच्या खिशाला न परवडणारी आहे, मात्र जिल्हा सामान्य रुग्णालयात ही सुविधा उपलब्ध झाल्याने चारशे ते आठशे रुपयात आजाराचे निदान होणार आहे. त्यामुळे रायगडकरांना फायदा होणार आहे.

## रोह्यातील धोकादायक रस्त्याची पोलीस निरीक्षकांकडून पाहणी

**रोहे : प्रतिनिधी**

शहरातील मेहेंदळे वाड्याच्या जागी आता टोलेजंग टॉवर उभा राहिला आहे. त्याच्या समोरील रस्ता अरुंद झाल्याने धोकादायक झाला आहे. सोमवारी (दि. २१) राम मारुती चौकात शिवजयंती निमित्ताने महाराजांना अभिवादन केल्यानंतर पोलीस निरिक्षक संजय पाटील यांनी काकासाहेब गांगल मार्ग व भाटे वाचनालयाकडे जाणाऱ्या रस्त्यांची पाहणी करत येणाऱ्या अडचणी जाणून घेतल्या.

मेहेंदळे वाडा या ठिकाणी विकासकाने टोलेजंग टॉवर उभारला आहे. त्यामुळे येथील रस्ता वाहनचालक व पादचाऱ्यांना धोकादायक ठरत आहे. याबाबत भाजप नेते संजय कोनकर यांनी वेळोवेळी पत्रव्यवहार करत मुख्याधिकाऱ्यांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यावर न.प.प्रशासनाकडून आजपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही. त्यामुळे प्रत्यक्ष जागेवर येऊन पाहणी करण्याची विनंती कोनकर यांनी पोलीस निरीक्षक संजय पाटील यांना केली होती. त्यानुसार पोलीस निरीक्षक पाटील सोमवारी या रस्त्याची पाहणी केली असून यासंबंधी मुख्याधिकाऱ्यांजवळ चर्चा करून उपाययोजना करण्यास सांगतो, असे आश्वासन संजय पाटील यांनी दिले आहे.



(छाया : महादेव सरसंबे)

## आरोग्य प्रहर

### बाळंतपणानंतरचा आहार व काळजी

बाळंतपणानंतर गर्भाशय हे हळूहळू पुर्वावस्थेला येऊ लागते. या दीड महिन्याच्या काळात निदान दोनदा नर्स बाईला भेटले पाहिजे. पहिली भेट ही तीन दिवसाच्या आतच घ्यावी. ताप येणे, पोट साफ न होणे, लघवीला त्रास होणे तसेच अंगावरून जाने, पोटात दुखणे अशा व्याधी उदभवू शकतात. त्याकडे दुर्लक्ष करू नये. थोडयाशा उपचारांनी या व्याधी बऱ्या होतात. तसेच स्तनात दूध साचू देऊ नये. ते काढून टाकावे नाहीतर गाठ बनते व बेंड होते.



**बाळंतपणानंतरचा आहार काय असावा?**

गरोदरपणासारखेच जन्मल्यानंतरही वाढीसाठी बाळ आईवरच अवलंबून असते. आईच्या दुधातून बाळाच्या वाढीसाठी योग्य असे सर्व प्रकारचे घटका मिळतात. म्हणूनच प्रत्येक बाळंतपणानंतर जोपर्यंत बाळ अंगावर पीत असते. तोपर्यंत आईच्या आहाराचे खूपच महत्त्व असते. तिच्या नेहमीच्या गरजा भागविण्यासाठी, बाळंतपणात शरीराची झीज भरून घेण्यासाठी, बाळाच्या वाढीसाठी लागणारे जास्तीचे घटक दुधात तयार होण्यासाठी आवश्यक असणारे घटक आहारातूनच मिळतात.

**आहार व काळजी**

* सकस व चौरस आहार मिळाला पाहिजे व पुरेशी विश्रांतीही घ्यावी.
* दिवसातून नेहमीपेक्षा जास्त वेळा जेवले पाहिजे.
* मसालेदार, तिखट पदार्थ कमी खावे.
* बाळंतपणानंतर लगेचच गर्भ निरोधक गोळ्या घेऊ नयेत.
* कोणत्याही तणावाखाली वावरू नये.
* दूध भरपूर येण्यासाठी हळीव, डिंक, खारीक, खसखस, खोबरे हे पदार्थ आहारात असणे गरजेचे आहे.

**या काळात व्यायाम करणे का गरजेचे असते?**

बाळंतपणानंतर स्त्रीचे शरीर हे थोडेसे ढिले पडते. सैल पडते आणि त्याला काहीसे बेडौलपणा येतो. गर्भाशय पूर्वावस्थेला येऊ लागते. अशावेळी शरीराला काही शारीरिक काही शारीरिक हालचाल, व्यायामाची गरज असते. पडल्या पडल्या हातापायांची हालचाली करणे, पोटांच्या स्नायूचे आकुंचन, प्रसरण होतील हे पहाणे, उताणे झोपून पाय गुडघ्यात दुमडून सरळ वर खाली करणे, पाय सरळ सोडून ताठ बसून पायांचे अंगठे हाताच्या बोटांनी पकडणे अशा हालचाली खूपच लाभदायक होऊ शकतात. त्याचबरोबर दिर्घश्वास घेणे, सोडण्याची कला ही शिकून घ्यावी. चालण्याचा व्यायामही करावा. काही सोपी योगासने फारच उपयोगी आहेत. उदा. मत्सासन, धनुरासन, सर्पासन, श्वसन परंतु अशी योगासने तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली करावीत.

**(साभार विकासपिडिया)**

## कर्जतमध्ये ९७ जणांचे रक्तदान

**कर्जत : बातमीदार**

अभिनव ज्ञान मंदिर संस्था, महाविद्यालय आजीवन अध्ययन व विस्तार विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने कर्जतमधील शारदा मंदिर शाळेत घेण्यात आलेल्या शिबिरात एकूण ९७ जणांनी रक्तदान केले.

वामनराव ओक रक्तपेढीने रक्तसंक्रमणाचे काम केले. यावेळी अभिनव ज्ञान मंदिर संस्थेचे कार्याध्यक्ष गणेश वैद्य, सचिव जनार्दन मोघे, डॉ. नीलकंठ फडके, रक्तपेढीचे प्रमुख डॉ. उमेश खारीवाला यांचे स्वागत प्रभारी प्राचार्य राजेंद्र पांडे, प्रा. सुजित देशमुख, प्रा. स्वप्नाली पाटील यांनी केले. गणेश वैद्य यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. सामाजिक कार्यकर्ते साईनाथ श्रीखंडे, विशाल जोशी यांनी शिबिरास भेट दिली.



# हागणदारीमुक्त अभियानासाठी कर्जत नगर परिषद प्रयत्नशील

## पब्लिक टॉयलेटमध्ये महिलांसाठी स्वतंत्र व्यवस्था

**कर्जत : बातमीदार**

स्वच्छ सर्वेक्षण अभियानात कचरा मुक्त शहर बरोबर हागणदारी मुक्त शहराच्या नामांकनमध्ये तिसरे स्थान मिळविण्यासाठी कर्जत नगरपालिका सज्ज झाली आहे. त्यासाठी शहरातील पब्लिक टॉयलेटमध्ये महिला वर्गासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात येत असून त्यात सॅनिटरी पॅडसाठी व्हेंडिंग मशीन आणि प्रक्रिया करणारी मशीन बसविण्याचे काम सुरू आहे.

'क' वर्ग नगरपालिका असलेल्या कर्जत शहराची वाढ झपाट्याने होत आहे. मात्र तरीदेखील कर्जत नगरपालिका हद्दीत यापूर्वीच हागणदारी मुक्त अभियान यशस्वी झाले आहे. शहरात एकूण ६८२० कुटुंबे असून त्यातील केवळ पाच टक्के लोकांकडे वैयक्तिक शौचालये नाहीत. नगरपालिकेने वच्छ भारत मिशन अंतर्गत शहरातील विविध भागात नऊ ठिकाणी कम्युनिटी टॉयलेट उभारले आहेत. वैयक्तिक शौचालय बांधू न शकणाऱ्या नागरिकांसाठी स्वच्छ भारत मिशनमधून प्रोत्साहन निधी देण्याची योजना आहे. नगरपालिकेने आतापर्यंत ६६५ कुटुंबांना वैयक्तिक शौचालय बांधण्यासाठी प्रत्येकी १२ हजाराची मदत केली आहे.

कर्जत नगरपालिकेला आतापर्यंत हागणदारी मुक्त अभियानामध्ये दोन स्टार मिळाले आहेत. त्यामुळे हागणदारी मुक्त शहराच्या यादीत तिसरे मानांकन मिळविण्यासाठी कर्जत नगरपालिका प्रशासनाने जोरदार तयारी केली आहे. त्यासाठी प्रामुख्याने सार्वजनिक शौचालयाऐवजी नागरिकांनी वैयक्तिक शौचालयसाठी प्रयत्न करावेत असे आवाहन मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांनी केले आहे. त्याचवेळी शहरात दोन ठिकाणी कम्युनिटी टॉयलेट उभारले आहेत. दहिवली येथील मार्केटयार्ड आणि बाजारपेठमधील पे अॅड पार्क या ठिकाणी सार्वजनिक शौचालये उभारली आहेत. त्या ठिकाणी महिला वर्गासाठी सॅनिटरी पॅड उपलब्ध होणार असून तेथेच बसवलेल्या व्हेंडिंग मशीनमधून हे पॅड उपलब्ध होणार आहेत. शिवाय इनसिरेशन मशीन बसवून तेथे निर्माण होणारा नष्ट केला जाणार आहे. बाजारहाट करताना महिलांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन हा उपक्रम आम्ही राबवत आहोत, अशी माहिती कर्जतच्या नगराध्यक्षा सुवर्णा जोशी यांनी दिली.




(छाया : संतोष पेरणे)

# भारताचा बांगलादेशवर दणदणीत विजय

**हॅमिल्टन : वृत्तसंस्था**

**महिला एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाने बांगलादेशवर ११० धावांनी दणदणीत विजय मिळवला आहे. भारताने बांगलादेशसमोर विजयासाठी २३० धावांचे आव्हान ठेवले होते, मात्र बांगलादेशला सर्वबाद ११९ धावाच करता आल्या. या विजयासह भारत गुणतालिकेत तीन विजयांसह सहा गुण मिळत तिसऱ्या स्थानावर पोहचला आहे. भारताचा साखळी फेरीतील शेवटचा सामना २७ मार्चला दक्षिण अफ्रिकेसोबत असणार आहे.**

## उपांत्य फेरीच्या आशा कायम




भारताच्या गोलंदाजीसमोर बांगलादेशचा एकही फलंदाज तग धरू शकला नाही. एकामागे एक असे करत सर्वच खेळाडू तंबूत परतले. शरमीन अक्तर (५), मुर्शिदा खातुन (१९), फरगाना होक (०), निगर सुलताना (३), रुमाना अहमद (२), रितू मोनी (१६), लता मोंडल (२४), सलमा खातुन (३२), नहिदा अक्तर (०), फहिमा खातुन (०) अशा धावा करून फलंदाज बाद झाले. जहानारा आलम (११*) या धावसंख्येवर नाबाद राहिली. भारताकडून स्नेह राणाने १० षटकांत ३० धावा देऊन चार गडी बाद केले. झुलन गोस्वामी आणि पूजा वस्त्राकर यांनी प्रत्येकी दोन, तर राजेश्वरी गायकवाड आणि पूनम यादव यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला.

भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. करो या मरोच्या सामन्यात स्मृती मंधाना आणि शेफाली वर्माने दमदार सुरुवात करून दिली. दोघांनी पहिल्या गड्यासाठी ७४ धावांची भागीदारी केली. ३० या वैयक्तिक धावसंख्येवर असताना स्मृती मंधाना नहिदा अक्तरच्या गोलंदाजीवर झेलबाद झाली. त्यानंतर ४२ धावा करून शेफालीही तंबूत परतली. त्यानंतर आलेल्या यस्तिका भाटीयाला हवी तशी साथ मिळाली नाही, पण एका बाजूला तिने संघाचा डाव सावरून धरला. मिताली राज (०), हरमनप्रीत कौर (१४), रिचा घोष (२६) धावा करून बाद झाल्या. यस्तिका भाटियाने ८० चेंडूंत दोन चौकारांच्या मदतीने ५० धावा केल्या. अर्धशतकानंतर ती बाद झाली.

## खोपोलीतील क्रिकेट स्पर्धेत रायगड राजे संघ विजेता

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली क्रिकेट असोसिएशन आयोजित टी-२० लेदर बॉल स्पर्धेत रायगड राजे संघाने विजेतेपद पटकाविले. अंतिम सामना रायगड राजे व मुंडे स्पोर्ट्स यांच्यात अटीतटीचा झाला. यामध्ये शेवटच्या क्षणाला रायगड राजेने बाजी मारली.


(छाया : विनायक माडे)

डीपी रोड चिंचोली येथील भव्य पटांगणावर झालेल्या टी-२० लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील नामांकित १६ संघांनी भाग घेतला होता. सामने रंगतदार झाले. अंतिम सामन्यात रायगड राजे संघाने प्रथम फलंदाजी करीत २० षटकांत नऊ गडी गमावून १६७ धावा केल्या होत्या. या आव्हानाचा पाठलाग करताना मुंडे स्पोर्ट्स संघाचे सर्व गडी १५६ धावांत बाद झाले. रायगड राजेने ११ धावांनी विजय प्राप्त करीत विजेतेपदावर आपले नाव कोरले. रायगड राजे या संघाचा देवांश तांडेल सामनावीर ठरला. त्याने १२ चेंडूंत १८ धावा फटकावून गोलंदाजी करताना ४५ धावा देत तीन गडी बाद केले.

खोपोली क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष यशवंतशेठ साबळे यांच्या हस्ते विजेत्या संघाला चषक व रोख पारितोषिक देण्यात आले. बक्षीस वितरण समारंभास असोसिएशनचे उपाध्यक्ष अशोक कांबळे, सचिव संजय तावडे, कोषाध्यक्ष सचिन मसुरकर, शंकर दळवी, माजी नगरसेवक अविनाश तावडे, चंद्रप्पा अनिवार, सुहास वजरकर, नईम मुक्री यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, क्रिकेटप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मालिकावीर, उत्कृष्ट फलंदाज, सर्वाधिक चौकार व षटकारासाठीचे पारितोषिक जयेश पोल याने पटकाविले. उत्कृष्ट गोलंदाज अथर्व दाखवे, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक रितिक पाटील, उत्कृष्ट यष्टीरक्षक रूपेश करण आदी खेळाडूंनाही गौरविण्यात आले.

## माणगाव क्रिकेट संघ प्रथम

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील श्री समर्थ ग्रामीण टेनिस क्रिकेट असोसिएशन मोर्बा विभाग यांच्या सौजन्याने सचिन इलेव्हन क्रिकेट क्लब निळगुणच्या वतीने कै. सचिन गुगळे यांच्या स्मरणार्थ क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत महाराणा प्रताप नगर माणगाव संघाने अंतिम सामन्यात खालची वाडी डोंगरोली संघाचा पराभव करीत प्रथम क्रमांक पटकाविला.



माणगाव निळगुण फाटा येथील मैदानावर झालेल्या या स्पर्धेत द्वितीय क्रमांक खालची वाडी डोंगरोली संघाने, तृतीय आमडोशी संघाने, तर चतुर्थ क्रमांक नवघर संघाने मिळविला. वैयक्तिक बक्षिसांमध्ये मालिकावीर दीपक पवार (माणगाव), उत्कृष्ट फलंदाज बाळाराम डोंगरे (डोंगरोली), उत्कृष्ट गोलंदाज अर्जुन पवार (माणगाव) यांची निवड करून त्यांनाही पारितोषिक देण्यात आले.

## मी माझे स्वप्न जगतोय -लक्ष्य सेन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचा २० वर्षीय बॅडमिंटनपटू लक्ष्य सेनला ऑल इंग्लंड स्पर्धेच्या अंतिम सामन्यात जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असलेल्या व्हिक्टर ॲक्सेलसेनकडून पराभूत व्हावे लागले, परंतु अंतिम फेरीचा टप्पा गाठल्याबाबत तो समाधानी आहे.

'अलमोडा ते ऑल इंग्लंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेपर्यंतचा प्रवास मोठा आहे. मी अंतिम फेरीत पराभूत झालो, पण मी सर्वोत्तम खेळ करू शकलो याचे समाधान आहे. देशाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणे ही माझ्यासाठी महत्त्वाची गोष्ट आहे. मी माझे स्वप्न जगत आहे आणि यापुढेही दर्जेदार खेळ करण्याचा प्रयत्न करेन. जगभरातून मला जे प्रेम मिळत आहे, त्यामुळे मी आनंदी आहे. मी सर्वांचे आभार मानू इच्छितो', असे लक्ष्यने ट्विटरवर म्हटले आहे.

## नवी मुंबईची सागरकन्या मंत्रा कुऱ्हेचा विक्रम

### धरमतर ते गेटवे अंतर कमी वेळेत पार

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील कोपरखैरणे येथील रहिवासी व वाशीच्या फादर आग्नेल हायस्कूलची इयत्ता सातवीत शिकणारी १२ वर्षीय विद्यार्थिनी मंत्रा मंगेश कुऱ्हे या सागरकन्येने धरमतर ते गेटवे ऑफ इंडिया हे ३८ किमीचे सागरी अंतर अवघ्या सात तास आणि ५४ मिनिटांत पार करून पोहण्यातील एक नवा विक्रम केला आहे. याआधी हेच अंतर आठ तास १८ मिनिटांत पार करण्याचा विक्रम एका महिला जलतरणपटूच्या नावावर होता जो मंत्राने मोडला आहे.

मंत्राने २० मार्च रोजी रात्री १ वाजून १० मिनिटांनी धरमतरच्या खाडीत आरंभीचा सूर मारून पोहण्यास सुरुवात केली. सकाळी ९ वाजून ४ मिनिटांनी तिने गेट वे ऑफ इंडियाच्या प्रवेशद्वार गाठले. हे ३४ किमीचे सागरी अंतर पार करताना मंत्राला अनेक अडचणीचा सामना करावा लागला. कधी विरुद्ध दिशेचा लाटांचा प्रवाह तिला मागे ढकलत होता, तर कधी समुद्रातील जेलीफिश तिला



टोचून जात होते, मात्र या सर्वांना न घाबरता नेटाने तिने सात तास आणि ५४ मिनिटांत हे अंतर पार करण्याचा मुलींमधील एक नवा विक्रम प्रस्थापित केला.

या वेळी माजी नगरसेवक मुनावर पटेल यांनी मंत्राचे स्वागत केले. तिच्या या विक्रमामुळे नवी मुंबईच्या शिरपेचात मानाचा आणखी एक तुरा खोवला गेला आहे. याआधी मंत्राने बरोबर एक वर्षापूर्वी २१ मार्च २०२१ रोजी एलिफंटा ते गेटवे ऑफ इंडिया हे सागरी अंतर दोन तास ५१ मिनिटांत कापून मुलींमध्ये एक नवा विक्रम प्रस्थापित केला होता, ज्याची नोंद इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये झालेली आहे. मंत्राला प्रशिक्षक गोकुळ कामत आणि अमित आवळे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

## जलतरणपटू ओमकार माळीने जिंकली पाच सुवर्णपदके



**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील करंजा सुरकीचापाडा येथील रहिवासी ओमकार सदानंद कोळी यांनी धुळे स्नेहानगर येथे झालेल्या दुसऱ्या महाराष्ट्र राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेत उत्तम कामगिरी करीत पाच सुवर्णपदके जिंकली. या कामगिरीमुळे केरळ येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी त्याची महाराष्ट्र संघात निवड झाली आहे.

ओमकारने १००, २०० व ४०० मीटर फ्री स्टाईल, २०० मीटर मिडल रिले आणि २०० मीटर फ्री स्टाईल रिले अशी पाच सुवर्णपदके पटकाविली. या सुवर्णपचंकाबद्दल विविध स्तरातून, क्षेत्रातून त्याच्यावर अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. मित्र परिवार, नातेवाईक, चाहत्यांनी त्याला प्रत्यक्ष भेटून त्याचे कौतुक केले.

## पेण यंगिस्तान संघ डीपी कपचा मानकरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

करंजाडे डॉक्टर्स असोएिशनतर्फे डॉक्टर फ्रेंण्डशीप कप क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचे उद्घाटन डॉ. प्रमोद गांधी यांच्या हस्ते, तर बक्षीस वितरण पनवेल महापालिकेचे नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. या क्रिकेट स्पर्धेत पेण यंगिस्थान संघाने प्रथम क्रमांक पटकावला.



स्पर्धेत तळोजा टायगर क्रिकेट संघाने द्वितीय, खांदा कॉलनी सुपरकिंग संघाने तृतीय आणि करंजाडे लायन्स संघाने चतुर्थ क्रमांक पटकावला तसेच डॉ. सचिन नाईक यांना सामनावीर, डॉ. तुषार कांबळे यांना उत्कृष्ट फलंदाज, डॉ. तुषार कांबळे यांना उत्कृष्ट फलंदाज, डॉ. अभिजित पाटील यांना उत्कृष्ट गोलंदाज, डॉ. आशीष करावकर यांना उत्कृष्ट क्षेत्ररक्षक व डॉ. अभिजित भोईर यांना उत्कृष्ट यष्टीरक्षक म्हणून सन्मानित करण्यात आले.

या वेळी भाजपचे विनोद साबळे, समीर केणी, कर्णा शेलार, सरपंच रामेश्वर आंग्रे, प्राचार्य गणेश ठाकूर, डॉ. संतोष जाधव, डॉ. आशीष गांधी, डॉ. कारंडे, डॉ. प्रकाश पाटील, डॉ. उमेश अमृतकर, डॉ. सतीश भोईर, डॉ. आनंद गोखले, डॉ. शिरीष जोशी, डॉ. इंदर चव्हाण, डॉ. पांढरे, डॉ. पराडकर, डॉ. पाटील, डॉ. सचिन पवार आदी उपस्थित होते.




## जागतिक तायक्वांडो स्पर्धेसाठी प्राजक्ता अंकोलेकरची निवड



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दक्षिण कोरियात होणाऱ्या जागतिक तायक्वांडो पुमसे स्पर्धेसाठी भारतीय ऑलिम्पिक संघटना व इंडिया तायक्वांडो यांच्या संयुक्त विद्यमाने औरंगाबाद विभागीय क्रीडा संकुल येथे निवड चाचणी घेण्यात आली. यामध्ये रायगड व नवी मुंबईची आंतरराष्ट्रीय तायक्वांडो खेळाडू प्राजक्ता अंकोलेकर हिने सहभाग घेत उत्कृष्ट प्रदर्शन केले. यामुळे तिची जागतिक स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झाली आहे.

स्पर्धेच्या पूर्व तयारीसाठी २५ दिवसांचे सराव शिबिर सुरू आहे. या शिबिरात प्रशिक्षण घेऊन प्राजक्ता २१ ते २४ एप्रिलदरम्यान होणाऱ्या १२ व्या पुमसे वर्ल्ड तायक्वांडो स्पर्धेसाठी दक्षिण कोरियातील गोयंका येथे जाणार आहे, प्राजक्ता गेली २० ते २५ वर्षे तायक्वांडोचे प्रशिक्षण आंतरराष्ट्रीय पंच व सातवी डिग्री ब्लॅक बेल्टधारक सुभाष पाटील यांच्याकडे घेत असून तिने अनेक राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्पर्धांमधून सुवर्णपदके जिंकली आहेत.

भारतीय संघात निवड झाल्याबद्दल महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे सचिव व इंडिया तायक्वांडोचे अध्यक्ष नामदेव शिरगावकर यांनी प्राजक्ताचे विशेष अभिनंदन केले आणि तिला जागतिक तायक्वांडो स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. प्राजक्ताचे रायगड तसेच नवी मुंबईतून कौतुक होत आहे.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com